# ६00 रुग्णांनी केली नेत्रतपासणी

जळगाव : डोळ्यांच्या पडद्याच्या मोफत तपासणी शिबिराचे आयोजन रेटिना इंडिया व एम्को फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने खान्देश सेंट्रल मॉल येथे करण्यात आले होते.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.एस.एन. लाळीकर, डॉ.शिवराज मुळीक, महापौर राखी सोनवणे, उपमहापौर सुनील महाजन, डॉ.रजत अग्रवाल, नगरसेवक रमेशदादा जैन, जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष अशोक जैन, डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी, रत्नाभाभी जैन, स्थायी समिती सभापती नितीन लड्ढा आणि एम्को फाउंडेशनच्या विश्वस्त मीनाक्षी जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत तपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. बायोनिक आयचे संशोधक डॉ.रजत अग्रवाल यांनी रुग्णांची तपासणी करून उपचार केले. जिल्हाभरातील ६०० रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रामेश्वर नाईक, अरविंद देशमुख, अमित देशमुख, पीतांबर भावसार यांनी परिश्रम घेतले. शिबिरातील मोतीबिंदू असलेल्या गरजू रुग्णांवर मुंबई येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. डॉ.रजत अग्रवाल यांनी रुग्णांची नेत्रतपासणी केली.



शिबिराचे उद्घाटन करताना राखी सोनवणे. रजत अग्रवाल, नितीन लड्ढा, रमेशदादा जैन, अशोक जैन, डॉ.एस.एन. लाळीकर, डॉ.शिवराज मुळीक, रत्नाभाभी जैन, मीनाक्षी जैन,